महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई टोलनाक्यावरुन २८०० वाहने टोल भरत नसल्याबाबत

(१) २२९५ (२३-१२-२०१४). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई एंट्री पॉईटच्या पाचही टोलनाक्यामधून मोजक्या वाहनांना टोलमधून सवलत मिळाली असताना दररोज २८०० वाहने टोल न भरताच जात असल्याचे माहे मार्च, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) या प्रकरणाची अद्यापही चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०५-२०१६) :(१) नाही, मुंबई एन्ट्री पॉईंटच्या पाचही टोलनाक्यावरुन अधिसूचनेनुसार ज्या वाहनांना सूट आहे, अशी मोजकी वाहने पथकर भरत नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खालापूर ते लोणावळ्या पर्यंत बोगदा, उन्नत मार्ग व चौदा पदरी रस्ता बांधण्याबाबत

(२) ८९४५ (१०-०४-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड

(कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खालापूर ते लोणावळ्या पर्यंत बोगदा तसेच ४ किलोमीटर उन्नत मार्ग बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) तसेच मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर (एक्सप्रेस-वे) खालापूर टोल नाक्यापासून लोणावळयापर्यंत वाहतूकीची कोंडी टाळण्यासाठी हा रस्ता चौदापदरी करण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आराखडयाचे स्वरुप काय आहे व तदनुसार उक्त रस्त्याचे सर्वेक्षण झाले आहे काय व सदरहू रस्त्यासाठी किती खर्च होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व उक्त दोन्ही प्रकरणांबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :(१) होय. याबाबतच्या सुसाध्यता अहवाल व प्रकल्प अहवाल दिनांक ३०.११.२०१५ रोजी मंत्रीमंडळ पायाभुत समितीने मान्य केलेला आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) याबाबत सुसाध्यता अहवाल व प्रकल्प अहवाल दिनांक ३०.११.२०१५ रोजी मंत्रीमंडळ पायाभूत समितीने मान्य केलेला आहे.

पुणे मुंबई महामार्ग चौपदरीकरणाच्या कामात अनेक त्रुटी असल्याबाबत

(३) १५४३० (१०-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ या रस्त्याचे मजबुतीकरण, चौपदरीकरण, सुशोभिकरण, तसेच दुरुस्ती व देखभालीचे काम राज्य रस्ते विकास मंडळाने बीओटी तत्वावर आयआरबी या खासगी संस्थेला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कि.मी. क्र. २०/२०० निगडी ते कि.मी. क्र. १३१/४०० शिळफाटा या सुमारे १११ किलोमिटर लांबीच्या रस्त्याच्या कामासाठी सुमारे ९२० कोटी खर्च करण्यात आले असून सन २००५-२००६ च्या सुमारास हे काम पूर्ण झाल्याचा दाखला परिवहन मंत्रालयाकडून प्राप्त करण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामात अनेक त्रुटी असताना संबंधित संस्था आणि रस्ते विकास मंडळाने या मार्गावर टोल आकारणी सुरु केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१२-१३ मध्ये पुन्हा चौपदीरकरणासह विविध अपुर्ण कामासाठी केंद्र शासनाकडून २८५.६० कोटीचा निधी मंजूर झालेला आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, कामे अपूर्ण असतानाही गेली ८ ते १० वर्षे अवैध टोल वसुलीतुन शासनाची फसवणूक केल्याबद्दल संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२७-०४-२०१६) :(१) होय.
(२) होय, पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ या रस्त्याच्या लांबीपैकी निगडी ते शिळफाटा या ११७ कि.मी. लांबीमधील काही भागाचे (कनेक्टरसह) चौपदरीकरण व मजबूतीकरणाचे काम करण्यासाठी देण्यात आले होते. यामध्ये संपूर्ण लांबीच्या चौपदरीकरणाचा समावेश नव्हता. या संबंधि दाखला अधिक्षक अभियंता, मिनिस्ट्री ऑफ शिंपिग, MoRT & H यांनी दि.०२.०९.२०१६ रोजी दिले आहे.
(३) नाही, केंद्रिय भूतल परिवहन मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांनी काम पूर्ण झाले असल्याने दि. ०५.०९.२००६ रोजी सदर रस्त्यावर पथकर घेण्यासाठी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. त्यानुसार दि. १३.०९.२००६ पासून उद्योजकाने पथकर गोळा करणे सुरु केले आहे.
(४) नाही, नव्याने प्रस्तावित असलेल्या कामांचा वाव पूर्वीच्या कामापेक्षा संपूर्णपणे वेगळा आहे. यात चौपदरीकरण न झालेल्या लांबीचे चौपदरीकरण करणे व अन्य कामांचा समावेश असून या अतिरिक्त कामाचे प्रस्तावाला केंद्र शासनाकडून वेगळी मंजूरी प्राप्त झाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे मुंबई रा.मा.क्र. ४ निगडी ते शिळफाटा (ठाणे) या रस्त्याचे चौपदरीकरण करणेबाबत

(४) १५४४१ (१०-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे-मुंबई रा.मा.क्र. ४ निगडी ते शिळफाटा (ठाणे) हा कि.मी. क्र.२०/४०० ते १३१/२०० दरम्यानचा रस्ता म्हैसकर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडे दिनांक ९ ऑक्टोबर, २००४ ला झालेल्या करारानुसार बांधा वापरा हस्तांतरीत करा या तत्वावर चौपदरीकरण करण्यासाठी देण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वामी विवेकानंद चौक व जुन्या बँक ऑफ इंडिया चौकात सातत्याने वाहतुक कोंडीला सामोरे लावे लागत असून दोन्ही ठिकाणी भुयारी मार्ग उभारणे तसेच देहूरोड लोहमार्ग ते देहूरोड बोर्डा चे डॉ.बाबसाहेब आंबेडकर रुग्णालय दरम्यान उड्डाणपुल उभारण्याची मागणी अनेक नागरिक व संघटनांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्ग रुंदीकरण करण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सर्व अतिक्रमणे हटविण्यात आली असून अद्यापही रस्त्यालगत विविध ठिकाणी राडारोडा पडलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) मंजुर झालेल्या रस्त्याचे काम पुर्ण होण्यासाठी अजुन किती कालावधी लागणार आहे, कालावधी लागणार असल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०५-२०१६) :(१) होय, पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ या रस्त्याच्या लांबीपैकी निगडी ते शिळफाटा या ११७ कि.मी. लांबीमधील काही भागाचे (कनेक्टरसह) चौपदरीकरण व मजबूतीकरणाचे काम करण्यासाठी देण्यात आले होते. यामध्ये संपूर्ण लांबीच्या चौपदरीकरणाचा समावेश नव्हता.
(२) होय.
(३) हे खरे नसून या महामार्गावरील अतिक्रमणे काढण्यात आली असून राडारोडा उचलण्याचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे.
(४) सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून निविदा अंतिमरित्या मंजूर झाल्यानंतर सदर काम १८ महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

एमएमआरडीएच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता मिळण्याबाबत

(५) १६२०३ (१०-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेच्या विस्तारीकरणाखेरीज मुंबईशी संबंधित एकाही प्रकल्पाची आजातागायत सुरुवात न केल्याने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमएमआरडीएच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता मिळण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील जालना रस्त्यावर उड्डाणपुलांचे काम प्रलंबित असल्याबाबत

(६) १८०७१ (०४-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील सर्वात रहदारीच्या जालना रस्त्यावर दीड वर्षांपासून तीन उड्डानपुलांची कामे राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) माध्यमातून सुरु असलेली कामे अद्याप पुर्ण झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपुले पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर रस्ते पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

मोंढा नाक्याजवळील पूलाचे काम जुलै, २०१५ मध्ये पूर्ण झाले आहे.

दोन उड्डाणपूलाचे काम प्रगती पथावर आहे.

(२) व (३)

(i) मनपाकडून अतिक्रमणे हटवून जागा उपलब्ध होण्यात झालेला विलंब.

(ii) अस्तित्वातील पाण्याची, टेलिफोन, विद्युत इ. सेवा वाहिन्या हटविण्यास लागलेला कालावधी.

(iii) महावीर चौकातील स्तंभाचे पुनस्थापने संबंधी निर्णय.

(iv) न्यायालयीन प्रकरणे.

या कारणामुळे सदर उड्डाणपुलांच्या कामास विलंब झाला तथापि ही सर्व कामे आता जवळ जवळ पूर्णत्वास येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पाचरल पेवे, म्हाप्रळ रस्ता, चिंचघर तिसे जामगे कदमवाडी रस्ता, आंबवली वळवण शिंदी रस्ता व पूल कुळवंडी पिंपळवाडी ते तांबरीचीवाडी रस्ता पूल, माणी चव्हाणवाडी येथे पूल बांधण्याबाबत

(७) १८९२९ (०७-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पाचरल पेवे, म्हाप्रळ रस्ता, चिंचघर तिसे जामगे कदमवाडी रस्ता, आंबवली वळवण शिंदी रस्ता व पूल कुळवंडी पिंपळवाडी ते तांबरीचीवाडी रस्ता पूल, माणी चव्हाणवाडी येथे पूल बांधण्याबाबत शासनाने सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय मान्यता देऊनही कामांना अद्यापी निधीची तरतूद करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कामांना त्वरित निधी मिळण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्य यांनी शासनाकडे तसेच जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (११-०३-२०१६) :(१), (२), (३), (४) व (५) प्रश्नाधीन रस्ते व पुलांची कामे नाबार्ड-२१ अंतर्गत नाबार्डने मंजूर केलेली असून सदर रस्ते व पूलांची कामे निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

अमरावती जिल्ह्यात रस्ते विकास महामंडळाद्वारे रस्त्याच्या विकासात्मक कामांबाबत

(८) २१४५२ (१४-०८-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात रस्ते विकास महामंडळाद्वारे अनेक रस्त्याची विकासात्मक कामे कंत्राटदाराकडून केली जात असून कंत्राटदारांना व्याजासह रस्ते विकास महामंडळाला २२५ कोटी रु. देणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोणता निर्णय घेतला तसेच कंत्राटदार काम करीत असतांना कामाचा दर्जा राखला जात आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०५-२०१६) :(१) हे खरे नाही.

महामंडळाकडे लवादा समोर चालू दाव्यापोटी १३ कोटी व एका प्रकरणी कंत्राटदाराने देयकावर स्वाक्षरी न केल्याने अंतीम देयकापोटी देय असलेली रक्कम रु.१७.५० लक्ष एवढीच देयके बाकी आहेत.

(२) अमरावती एकात्मीक रस्ते विकास प्रकल्पाअंतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून आतापर्यंत एकूण ५० कामांपैकी ४८ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त अन्य यंत्रणाकडूनही ७ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. पूर्ण करण्यात आलेल्या कामांचा ताबा महानगरपालिका, अमरावती व सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांच्याकडे देण्यात आला आहे. या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम त्या त्या विभागाकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ट्रामा सेंटर सुरु करण्याबाबत

(९) २४२५४ (१४-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघातांची संख्या वाढत असून, जखमींचा वेळेत उपचार होत नसल्याने अनेकांना प्राण गमवावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, द्रुतगती मार्गावर मावळ तालुकयातील बऊर परिसरात गेल्या तीन वर्षापासून आत्तापर्यंत तब्बल ६० अपघातात ७० ते ८० जणांना वेळेत उपचार न मिळाल्याने प्राण गमवावे लागले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) खंडाळा ते देहूरोड दरम्यान अपघात झाल्यास जखमींना निगडी, तर खंडाळा घाट ते कळंबोली दरम्यान अपघात झाल्यास जखमींना पनवेल येथे उपचारासाठी न्यावे लागत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, द्रुतगती मार्गावर अपघातांच्या प्रमाणात वाढ होत चालली आहे. अपघातानंतर जखमींना तातडीने उपचार मिळण्यासाठी ट्रामा सेंटर होणेबाबत मंजुरी देण्यात आली आहे काय, असल्यास, ट्रामा सेंटर केव्हा आणि कोठे होणार आहे नसल्यास, विलंबाची कारणे ?

श्री. एकनाथ शिंदे (२७-०४-२०१६) :(१) व (२) नाही. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील गेल्या वर्षाच्या पोलीस विभागाच्या आकडेवारीनुसार अपघातांच्या संख्येमध्ये सातत्याने घट होत आहे.

वर्षे	एकूण अपघात	मृत
२००९	५४१	१३१
२०१०	४५८	१०४
२०११	४१२	११८
२०१२	३६४	१४३
२०१३	३३९	१२९
२०१४	३५३	१३३
मे-२०१५	१३९	४७

(३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने द्रुतगती मार्गाच्या देखभाल दुरुस्तीसाठी नेमलेल्या कंत्राटदाराने रुग्णालयासोबत केलेल्या करारनाम्यानुसार गंभीर जखमींना रुग्णवाहीकेमार्फत लोकमान्य हॉस्पिटल, निगडी किंवा एम.जी.एम.हॉस्पिटल, पनवेल येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात येते.

(४) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघातात सातत्याने घट होत आहे. अपघातांतील जखमींच्या तातडीने वैद्यकीय उपचारासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ट्रामा सेंटर बांधण्यासाठी ओझर्डे येथे मे.वुडस्टॉक हेलिकॉप्टर्स प्रा.लि. यांना काम दिले असून सदर बांधकाम पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे.

जुन्या मुंबई पुणे महामार्गाच्या ओढ्यालगत असलेल्या
पुलाच्या संरक्षक कठड्यांची झालेली दुरावस्था

(१०) २४२६२ (१३-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा-मावळ तालुक्यातील वडगांव सांगवी पुलाचे दोन्ही कठडे तुटले आहेत तसेच जुन्या मुंबई पुणे महामार्गाच्या ओढ्यालगत असलेल्या पुलाच्या संरक्षक कठड्यांची दुरावस्था झाली असून दुभाजकाची उंची अत्यंत कमी असल्याने अवजड वाहने सहज दुभाजक ओलांडून विरुध्द बाजूला जात असल्याने अपघात होत आहे, असे माहे २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गावर अतिवेगाने २४ तास अवजड व इतर वाहतूक सुरू असून ओढ्यावरील पूल, मोऱ्यांच्या संरक्षक कठड्याचे दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साईडपट्या खचल्याने अवजड वाहने महामार्गावरुन जात असताना अचानक साईडपट्यावर घसरुन पलटी होण्याच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे मुंबई महामार्ग क्र.४ वरील प्रवास सुखरुप होण्यासाठी महामार्गावर ओढ्यावर दुरुस्त करणेबाबत रस्ते विकास महामंडळाच्यावतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०५-२०१६) :(१) व (२) हे खरे नाही.

सदर प्रश्नात उल्लेख केलेला पूल हा वडगाव सांगवी रस्त्यावर (ग्रा.मा.-२) वर असून सदर पुलाचे देखभाल दुरुस्ती जिल्हापरिषद पुणे मार्फत करण्यात येते. सद्यस्थितीत या मार्गावरील ओढ्यांवरील पूलांचे व मोऱ्यांचे संरक्षण कठडे सुस्थितीत आहेत.

(३) साईड पट्ट्या मुरुमाच्या असल्यामूळे अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे खराब होतात हे अंशत: खरे आहे परंतु सदर साईड पटट्या निविदा शर्तीप्रमाणे उद्योजकाकडून लगेचच दुरुस्त करण्यात येतात.

(४) मुंबई-पुणे रा.म. क्र.४ या महामार्गावर पुलाचे अथवा मोऱ्यांचे कठडे तुटल्यास ते उद्योजकामार्फत निविदा शर्ती प्रमाणे वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा (जि.पालघर) तालुक्यातील अंभरभुई गावातील आदिवासी मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

(११) २४३७१ (१४-०८-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील नैसर्गिक वन संपत्तीचे वरदान लाभलेल्या अंभरभुई गावात १०० टक्के आदिवासी लोकवस्ती आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील आदिवासी विज, पाणी, रस्ते इ.मूलभूत सुविधांपासून आजही वंचित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

श्री. विष्णु सवरा (३१-०३-२०१६) :(१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

वाडा तालुक्यातील (जि.पालघर) अंभरभुई गावामध्ये विद्युतीकरण करण्यात आले असून सदर गावामध्ये २१ घरगुती वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात आला असून कोणत्याही प्रकारचा वीज पुरवठा मागणी अर्ज प्रलंबित नाही.

अंभरभुई येथील वाड्या / पाड्या मध्ये विहिरी व हातपंप असल्याने तेथे पाणी टंचाईचा प्रश्न उद्भवलेला नाही. तसेच सदर गावामध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजना मंजूर झालेली आहे.

अंभरभुई गावातील कोमपाडा, हिरवेपाडा, इमांतीपाडा व डवलेपाडा या पाड्यावर रस्त्याची समस्या आहे.

अंभरभुई गावामध्ये अंगणवाडी केंद्र सुरु केले असून इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत जिल्हा परिषद शाळा आहे. व पुढील शिक्षणासाठी ३ किलोमिटरवर असलेल्या नोंदणी गावात जावे लागते. सन २०१३-१४ मध्ये जनसुविधा योजनेंतर्गत स्मशानभुमी बांधून दिली असून आजमितीस स्मशानभुमी सुस्थितीत आहे.

राज्यातील एमएसआरडीसीचे कामे प्रलंबीत असल्याबाबत

(१२) २५९४२ (३१-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एमएसआरडीसीचे वेगवेळ्या १२ कामांसाठी ३२५८७ कोटी रुपये येणार आहे ही कामे जवळपास २०१२ पासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएसआरडीसीचे वर्षानुवर्षे रखडलेल्या प्रकल्पाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणताच निर्णय होत नसल्यास एमएसआडीसीचे महत्वाचे प्रकल्प पुर्ण करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०५-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) दिनांक ३०.११.२०१५ रोजी मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत महामंडळाने सादर केलेल्या काही प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देऊन काही प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून शासनाने घोषित केले आहे. त्यानुसार या प्रकल्पांसाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही महामंडळाच्या स्तरावरुन सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील होटगी येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांची गैरसोय थांबवणेबाबत

(१३) २८९९३ (२३-१२-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील होटगी येथील आदिवासी विद्यार्थ्यांची शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या बहुउद्धेशीय सभागृहाचे पत्रे माहे मे, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान उडून गेल्याने विद्यार्थ्यांच्या निवासाची व स्वयंपाकगृहाची व्यवस्था वर्गातच करण्यात आल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,
(२) तसेच, प्रशाळेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला वारंवार पत्रव्यवहाराने कळविले असून देखील कोणतीच कार्यवाही अद्यापपर्यंत झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या बहुउद्धेशीय सभागृहाचे पत्रे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०५-०३-२०१६) : (१) शासकीय आश्रमशाळा होटगी, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर येथील आश्रमशाळेच्या बहुउद्देशिय सभागृहाचे पत्रे वादळामुळे उडाल्याची बाब खरी आहे. तथापि विद्यार्थ्यांच्या निवासाची व स्वयंपाकगृहाची व्यवस्था वेगवेगळी व स्वतंत्ररित्या करण्यात आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने बहुउद्देशिय सभागृहाची दुरुस्ती केलेली आहे. तसेच बहुउद्देशिय सभागृह व स्वयंपाकगृहावरील पत्रे बसविण्याचे काम पुर्ण झालेले असुन रंगरंगोटीचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिंगावे (ता.शिरपुर, जि.धुळे) येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह मंजूर असून काम झाले नसलेबाबत

(१४) २९३६९ (२३-१२-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंगावे (ता.शिरपुर, जि.धुळे) येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह मंजूर असून निधी उपलब्ध असताना अद्याप काहीच काम झाले नसल्याने उक्त काम त्वरीत सुरु करण्यात यावे यासाठी दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ रोजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत धुळे जिल्ह्यातील आदिवासी जनतेच्या अनेक प्रलंबित प्रश्नांबाबत लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०३-०५-२०१६) :(१) व (२) हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, धुळे यांच्या दि.२४.११.२०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर वसतीगृहाच्या रु.४४२.४७ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी सदर वसतीगृहाच्या बांधकामाकरीता रु.२५.०० लक्ष इतका निधी माहे जानेवारी, २०१६ मध्ये कार्यकारी अभियंता (रोहयो), सावर्जनिक बांधकाम विभाग, धुळे यांना वितरीत करण्यात आलेला आहे. सदर कामाची निविदा प्रक्रीया प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याची राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूरला जोडणारा ८०० कि.मी. लांबीचा नवा द्रुतगती महामार्ग बांधण्याबाबत

(१५) २९५८४ (२२-१२-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.सदा सरवणकर (माहिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्याची राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूरला जोडणाऱ्या ८०० कि.मी. लांबीचा नवा द्रुतगती महामार्गाची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे जुलै, २०१५ मध्ये त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे व या महामार्गाकरिता आतापर्यंत किती भूसंपादन करण्यात आले आहे,
(३) असल्यास, केलेल्या अंमलबजावणीचा तपशील काय,
(४) असल्यास, सदर महामार्ग निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :(१) होय.
(२) हा द्रुतगती दळण वळण महामार्ग हा नव्याने बांधावयाचा प्रस्तावित असून नागपूर ते मुंबई महामार्गाची लांबी कमी कमी अंतराची रहावी या दृष्टीकोनातून नियोजन आहे. यासाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे.
संरेखा निश्चितीनंतर भूसंपादन करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यामुळे सध्या भूसंपादन झाल्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) सविस्तर प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रक तयार करणेकरीता निविदा प्रक्रिया करण्यात सुरु आहे.
(४) प्रत्यक्ष बांधकामाकरीता निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाडेगाव अकोला व बाळापूर-पातूर या राज्यमार्गावरील कायमस्वरुपी रस्ते दुरुस्तीबाबत

(१६) २९६७८ (२२-१२-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील वाडेगाव अकोला व बाळापूर-पातूर या राज्यमार्गावर पडलेल्या खडयामुळे अनेकांचे बळी गेले असून पडलेल्या खडडयांबाबत संबंधित विभागाला निवेदन देऊनही सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नाची दखल घेऊन वाडेगाव अकोला व बाळापूर-पातूर या राज्यमार्गावरील कायमस्वरुपी रस्ते दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१६) :(१) हे खरे नाही.
वाडेगाव अकोला व बाळापूर-पातूर राज्यमार्गावर सन २०१५ च्या पावसाळयात पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती करण्यात आली असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) बाळापूर-पातूर या राज्य मार्ग रस्त्याची भारतीय रस्ते मानकाप्रमाणे (आय.आर.सी.) कायमस्वरुपी दुरुसती करण्याचे काम मार्च, २०१६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले आहे.

वाडेगाव-माझोड अकोला कायमस्वरुपी रस्ता दुरुस्तीचे काम निधी, निकष व मंजूरीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे-बोरिवली भूयारी मार्ग तसेच घोडबंदर मार्गावरील गायमूख ते वर्सोवा या उन्नत मार्गाच्या प्रकल्पांच्या मंजुरीबाबत

(१७) २९८४० (२२-१२-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बोरिवली भूयारी मार्ग तसेच घोडबंदर मार्गावरील गायमूख ते वर्सोवा या उन्नत मार्गाच्या दोन्ही प्रकल्पांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने केंद्र सरकारकडे मंजूरीसाठी पाठविला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्र शासनाने सकारात्मक मंजूरी दिल्याचे राज्य शासनास कळविले आहे काय व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) अद्याप केंद्र शासनाने उक्त दोन्ही प्रकल्पांना मंजूरी दिली नसल्यास राज्य शासनाकडून करावयाच्या पाठपुराव्याची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) महामंडळाने सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराकडून निविदा मागविल्या आहेत. सल्लागाराच्या नेमणुकीनंतर प्रकल्पासाठीचा सुसाध्यता अहवाल व पर्यावरण ना हरकत दाखला मिळविण्यासाठी आवश्यक अभ्यास करुन आवश्यकतेनुसार केंद्र शासनाची परवानगी घेणे आवश्यक राहील.

अकोला- हिंगोली द्रुतगती महामार्गावरील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

(१८) ३०३१४ (२२-१२-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम शहर हे वाशिम जिल्हयाचे मुख्यालय असून शहरातून जाणाऱ्या अकोला- हिंगोली द्रुतगती महामार्गावर शहाराच्या हद्दीत ठिकठिकाणी मोठमोठे घातक व जीवघेणे खड्डे पडले असल्यामुळे अनेक अपघात होऊन प्रवाश्यांचा जीव धोक्यात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यातील खड्डे बुजविण्याबाबत संबंधित विभाग रस्त्याच्या देखभालीकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१६) :(१) व (२) हे खरे नाही.

अकोला वाशिम हिंगोली राष्ट्रीय महामार्गाच्या नियतकालिक नुतनीकरणाचे काम करण्यापुर्वी वाशिम शहरातील महामार्गावरील खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्यात आले असून त्यानंतर रस्त्याचे डांबरी नुतनीकरण सद्यस्थितीत पुर्ण करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील नवीन प्रशासकीय इमारत उभारण्याबाबत

(१९) ३१०९४ (२२-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील दुर्गम व डोंगरी भागातून येणाऱ्या नागरीकांना त्यांची सर्व शासकीय कामे करणे सोयीचे व्हावे व वेळेचा अपव्यय टाळावा यासाठी पौंड येथील तहसिलदार कचेरीच्या जागी नवीन प्रशासकीय इमारत उभारण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२९-०३-२०१६) :(१) प्रस्ताव शासनाडे २०१२ साली प्राप्त झाला आहे. तथापि नियतव्ययापाची मर्यादित उपलब्धता व प्रगतीतील कामाची उर्वरित किंमत विचारात घेता हे काम हाती घेण्यात आले नाही.
(२) व (३) प्रश्नाधीन प्रस्तावास सार्वजनिक बांध्कांम विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. प्रशासकीय मान्यतेवर प्रश्नाधीन काम निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोतन आहे.

नवी मुंबई सीबीडीमधील सी.जी.ओ. कॉम्प्लेक्स या इमारतीची झालेली दुरावस्था

(२०) ३१३७२ (२२-१२-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सीबीडीमधील सी.जी.ओ. कॉम्प्लेक्स या विविध शासकीय कार्यालये असलेल्या इमारतीची दुरावस्था झाली असून इमारतीच्या दुरुस्तीचे काम ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या भिंतीमधून लोखंडी सळ्या बाहेर आल्या असून इमारत धोकादायक अवस्थेत असल्याने केव्हाही अपघात होऊ शकतो यासाठी इमारतीची दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्याबाबत कर्मचाऱ्याकडून मागणी होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतीची दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०४-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कार्यपालक अभियंता, नवी मुंबई केंद्रीय मंडळ, केंद्रीय लोक निर्माण विभाग, नवी मुंबई यांचे कार्यालयामार्फत ठेकेदारास इमारत रिपेरिंग चे कार्य लवकर पूर्ण करणेबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे येथील आश्रमशाळा व वसतीगृहांमधील मुलींच्या सुरक्षिततेसाठी शासनाने सल्लागार समिती स्थापन करण्याबाबत

(२१) ३१५७४ (२२-१२-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील आश्रमशाळा व वसतीगृहांमधील मुलींच्या सुरक्षिततेसाठी शासनाने सल्लागार समिती स्थापन करण्याचे आदेश माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये दिले असून अद्याप समितीची स्थापना झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२१-०४-२०१६) :(१) हे खरे नाही.

याबाबत शासनाचे दि. ९/९/२००५ चे निर्देश असून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे या कार्यलयांतर्गत असलेल्या आश्रमशाळा व वसतिगृहामधील मुलांची सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९/१/२०१६ रोजी जिल्हा सल्लागार समितीचे पुर्नगठन केलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील (ता.चंदगड) रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाल्याबाबत

(२२) ३२५७१ (२२-१२-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील (ता.चंदगड) सरोळी, कुदनूर, कालकुद्री, कोवाड जवळील पाच रस्ते व सुपे-शिनोली, कुदनूर-तळगुळी, कोवाड-दड्डी आदि रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्नाधीन ५ रस्त्यांपैकी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी असलेल्या ४ रस्त्यांची पाहणी कार्यकारी अभियंता सा.बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर यांनी दिनांक ४.०६.२०१५ रोजी केली आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्त्यांच्या खराब लांबी मध्ये खडीकरण करुन व डांबरी खड्डे भरुन रस्ते वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहेत.

जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे देखभाल व दुरुस्तीसाठी असलेला कोवाड व दड्डी या रस्त्यांच्या कोवाड व चिंचणे या रस्त्याची दुरुस्ती करण्याचे काम निविदा स्तरावर आहे. उर्वरीत लांबीतील रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) बेळगांव-वेंगुर्ला रस्त्यावरील तडशिनहाळ नजिकच्या आरटीओ नाक्याजवळील रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

(२३) ३२५७८ (२२-१२-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) बेळगांव-वेंगुर्ला रस्त्यावरील तडशिनहाळ नजिकच्या आरटीओ नाक्याजवळील रस्त्याचे काम गत तीन वर्षांपासून अद्याप अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याचे काम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०५-२०१६) :(१), (२), (३) व (४) हे खरे नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे स्वतंत्र सल्लागार तसेच महामंडळाचे अधिकारी प्रकल्पाच्या कामावर वारंवार देखरेख करत असतात. सदरहू प्रकल्पाचे जवळपास ९८ टक्के काम पूर्ण झाले असून महामंडळाच्या प्रकल्प सल्लागाराने प्रकल्पाच्या कामाबाबतचे तात्पुरते पूर्णत्वाचे प्रमाणपत्र ही दिले आहे. त्यास अनुसरुन महामंडळाने सेवा शुल्क वसुलीसाठी अधिसूचना निर्गमित करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

जिल्हाधिकारी, लातूर यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्ती खर्चात गैरव्यवहार झाल्याबाबत

(२४) ३२६६७ (२४-०२-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ मध्ये जिल्हाधिकारी लातूर यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्ती खर्चात गैरव्यवहार झाल्याची बाब माहितीच्या अधिकारात निदर्शनास आली असून याबाबत झालेल्या तक्रारीनुसार तत्कालीन कार्यकारी अभियंता, सा.बां.लातूर यांनी रू.३५.०० लक्ष किंमतीची एकूण ७ कामे केलेली असून उर्वरित रू.४०.०० लक्ष किंमतीच्या एकूण ८ कामांशी सा.बां. विभाग, लातूर यांचा कोणताही संबंध नाही अशी अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक मंडळ, औरंगाबाद यांना माहिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उर्वरित रू.४०.०० लक्ष किंमतीची एकूण ८ कामे जिल्हाधिकारी, लातूर यांनी परस्पर स्वत:चे अधिकारात शासनाचे प्रचलित नियम डावलून करवून घेतली व त्यांची देयकेही सा.बां.विभाग, लातूर यांचेकडून संगनमताने मंजूर करुन घेतलेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहिती नुसार दिनांक १८ नोव्हेंबर, २०११ व दि.३०/१२/२०११ च्या दक्षता पथक (अधिक्षक अभियंता, व गुणनियंत्रक मंडळ, औरंगाबाद) यांनी केलेल्या पाहणी अहवालात तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी शासनाचे नुकसान केल्याबद्दल गंभीर निरीक्षण नोंदवले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी झालेला गैरव्यवहार सिध्द होत असून या गंभीर प्रकारास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-०४-२०१६) :(१), (२), (३) व (४) लातूर जिल्हाधिकारी निवासस्थानच्या दुरुस्ती खर्चातील गैरव्यवहाराबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली. त्यानुसार या प्रकरणी प्रशासकिय अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधितांना ताकीद देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्रातील ४५ पैंकी १७ जमातीच्या आदिवासी ख-या आहेत किंवा नाही याचे संशोधन करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

(२५) ३३०४९ (२३-१२-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील ४५ पैंकी १७ जमातीच्या आदिवासी ख-या आहेत किंवा नाही याचे संशोधन करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाला राज्यातील अनेक स्तरातून तीव्र विरोध दर्शविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संशोधन करण्यात येऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२७-०४-२०१६) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्रातील ४५ पैकी १७ जमातीच्या आदिवासी खऱ्या आहेत किंवा नाही याबाबत नसून या जमातीच्या मानववंश शास्त्र दृष्टिकोनातून अभ्यास करण्याबाबत आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर शासन निर्णयाला होणाऱ्या विरोधाच्या अनुषंगाने आता सर्व ४५ जमातींचा मानववंश शास्त्रीय दृष्टीकोनातून संशोधन एक अभ्यास प्रक्रिया म्हणून तीन टप्प्यामध्ये निधी उपलब्धतेनुसार करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यामध्ये आदिवासी जमातींच्या यादीतील पहिल्या १५ जमातींच्या अभ्यास सन २०१४-१५ करीता प्राप्त निधीतून करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण-औरंगाबाद रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत

(२६) ३३२०५ (२३-१२-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण ते औरंगाबाद हे ५० कि.मी. चे अंतर जिल्हा व तालुका जोडणारा असल्याने सदर रस्ता २००४ साली चौपदरीकरणासाठी मंजूर झालेल्या या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन २०१४ मध्ये करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात राज्य शासनाने हा रस्ताच रद्द केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पैठण-औरंगाबाद रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१६) :(१) हे खरे आहे

शासन पथकर धोरण बदलल्याने दिनांक २४/०७/२०१५ च्या शासन पत्रान्वये या कामाच्या निवीदा रद्द करण्यात आल्या आहेत.

(२) i) सदरील प्रकल्प निधी उपलब्धतेनुसार ॲन्यईटी (Annuity) या योजनेतून हाती घेण्याचे नियोजन आहे.

ii) दि.०३/१२/२०१५ रोजी सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे अंत्रज व दधम येथील फासेपारधी समाजातील नागरिकांना जमिनी मिळणेबाबत

(२७) ३३२६५ (०८-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंत्रज व दधम येथील फासेपारधी समाजातील लोकांच्या जमिनी मिळण्याबाबतची मागणी गेली अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या फासेपारधी समाजाच्या लोकांनी याकरिता सन २००९ मध्ये याबाबत शासनास करारनामे करून दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांना शासनामार्फत जमिनी देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (३१-०३-२०१६) : (१) हे खरे नाही.

तथापि, भूमिहीन सबळीकरण योजनेंतर्गत जमिन मिळणेकरीता मौजे अंत्रज येथील ६४ अर्जापैकी २२ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. तसेच दधम येथील १७ लाभार्थ्यांचे अर्ज जमिनी मिळण्यासाठी प्राप्त झाले आहेत. परंतू जमिनी उपलब्ध न झाल्याने त्यांना योजनेतंर्गत लाभ देता आलेला नाही.

(२) हे खरे नाही.
भूमिहीन सबळीकरण योजनेंतर्गत लाभार्थ्यांकडून फक्त जमीन मिळणेकामी अर्ज भरुन घेतलें जातात, शासकीय करारनामे करुन देण्यात येत नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड-मनमाड-नांदगाव राज्य मार्ग क्र.२४
वाहतुकीस योग्य नसल्याबाबत

(२८) ३३२९१ (२३-१२-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक पूर्व या विभागांतर्गत असलेला चांदवड-मनमाड-नांदगाव राज्य मार्ग क्र.२४ वर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी योग्य राहिलेला नसल्याने या रस्त्यांवर सातत्याने अपघात होऊन त्यात अनेक जण जखमी होऊन काही जणांचा मृत्यू झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा राज्य मार्ग वाहतुकीसाठी योग्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१६) : (१) हे अंशत: खरे आहे.
तथापी सदर रस्त्यावरील झालेले अपघात हे भरघाव वगे व चालकाच्या चुकीमुळे झालेले आहेत.
(२) सदर रस्त्यावरील खड्डे सार्वजनिक बांध्ंकाम विभागामार्फत भरून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हयामध्ये आदिवासी भागासाठी असलेला विकास निधी
बिगर आदिवासी भागासाठी वापरण्यात आला असल्याबाबत

(२९) ३४७१८ (२२-१२-२०१५). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयामध्ये आदिवासी भागासाठी असलेला विकास निधी बिगर आदिवासी भागासाठी वापरण्यात आला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहील्या आठवडयात उघडकीस आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे तक्रारी प्राप्त झाल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नियुक्त करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२९-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) प्रकल्प अधिकारी, कळवण कार्यालयामध्ये मागासवर्गीयांचे कल्याण अंतर्गत आश्रमशाळेतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन कळवण प्रकल्प कार्यक्षेत्रातील खाजगी संगणक प्रशिक्षक संस्थांनी प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात येत आहे.
(३) चौकशीचे कम सुरु आहे. त्यामुळे अहवाल प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बांद्रा (पूर्व) येथील शासकीय कर्मचा-यांसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीच्या आतील व बाहेरील दुरुस्तीबाबत

(३०) ३४८०७ (०५-०२-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या उपनगरातील बांद्रा (पूर्व) येथील शासकीय कर्मचा-यांसाठी बांधण्यात आलेल्या वसाहतीतील ईमारती नादुरुस्त असल्याबाबत तेथील रहिवाशांनी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बांद्रा यांना दिनांक २७ मे २०१५ व दिनांक २९ जून २०१५ रोजी वा त्यासुमारास वारंवार विनंती अर्ज देवून तसेच तेथे ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत नोंद करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच अर्ज घेऊन जाणा-या अर्जदारांवर तेथील अधिकारी व कर्मचारी हे बेजबाबदार उत्तरे देऊन त्यांना तेथून हाकलून लावतात हे खरे आहे काय,
(३) असल्यास संबधित अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१६) :(१) दि. २७ मे, २०१५ व दि.२९ जून, २०१५ रोजी वर्ग-४ च्या सदनिका दुरुस्त करणेबाबत बांद्रा सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभाग क्र.२ यांचेकडे रहिवशांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच या कालावधीत सार्वजकिन बांधंकाम सेवाकेंद्रावर असलेल्या तक्रार नोंदवहीमध्ये नोंद केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध निधीच्या अधीन राहून किरकोळ स्वरुपाची कामे तातडीने करण्यात येतात व अत्यावश्यक संरचनात्मक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा येथील कांरधा पथकर वसुली बंद करण्याबाबत

(३१) ३५३८० (२२-१२-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथील कांरधा पथकर वसुली बऱ्याच वर्षापासून होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी किती वर्षे पथकर वसुली होणार आहे,

(३) असल्यास, या ठिकाणी रस्त्याची दुरावस्था झालेली असून देवरी ते नागपूर १२५ कि.मी. पर्यंत आधीच पथकर वसुली नाके झाल्यामुळे नागरिकांना त्यांचा त्रास होत असून त्यामुळे संतापाची भावना पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पथकर वसुली बंद करण्याबाबत व रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१६) :(१) व (२) नागपूर ते रायपूर ह्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरील कि.मी. ४९१/०० मधील वैनगंगा नदीवरील मोठ्या पुलाचे बांधकाम तसेच अस्तित्वातील १३.०० कि.मी. दुपदरी राष्ट्रीय महामार्गाचे मजबुतीकरण करणे हे काम बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर करण्यात आले असून दि. ०३.०३.२००१ पासून पथकर वसुली सुरु आहे. सदरील पथकर वसुली दि. १२.०२.२०१८ पर्यंत सुर राहणार आहे.

(३) या प्रकल्पामध्ये १३.०० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीचा समावेश असून सदर लांबी वाहतुकीस सुस्थितीत असल्याचे क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

(४) सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत असभ्याने पथकर वसुली बंद करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-बडोदा व्हाया पनवेल द्रुतगती मार्गात पालघर व ठाणे जिल्ह्यातील सुमारे २०० शेतकरी भूमीहीन होत असल्याबाबत

(३२) ३५५१६ (२२-१२-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई -बडोदा द्रुतगती मार्गासाठी पालघर व ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या असून जिल्ह्यातील सुमारे २०० शेतकरी भूमीहीन होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-बडोदा व्हाया पनवेल या द्रुतगती मार्गाचे ३८० कि.मी. रस्त्याचे काम केंद्र शासनाने हाती घेतले असून त्यामध्ये पालघर जिल्ह्यातील तलासरी, डहाणू, पालघर, वसई, वाडा व ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, कल्याण, अंबरनाथ या तालुक्यातून सदरहू रस्ता पनवेल मार्गास जोडण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) वाडा तालुक्यातील संपादित करण्यात येणाऱ्या गावातील आदिवासी शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात जमिनी जाणार असून त्यातील काही शेतकरी भूमिहीन होणार आहेत. या नियोजित रस्त्यावर अनेक गरिबांची घरे आहेत व त्यामुळे बेघर होणाऱ्या शेतकऱ्यांना शासन कोणत्या प्रकारे सहाय्य करणार आहे व शासनाचे नियोजन काय आहे,

(४) या भागातील शेतकरी संघर्ष कृती समितीने या रस्त्याला आपला तीव्र विरोध शासनाकडे नोंदविला आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१६) :(१) केंद्र शासनाच्या अधिनस्थ असलेल्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणा यांचेमार्फत मुंबई-बडोदा व्हाया पनवेल द्रुतगती मार्गासंबंधितचे भुसंपदान प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पाच्या मुंबई-बडोदा या मुख्य द्रुतगती मार्गासाठी पालघर जिल्हयातील २०६४ सर्व्हे क्र. व ठाणे जिल्हयातील ६३ सर्व्हे क्र. मधील भूसंपादन करण्यात येत आहे.
(२) मुंबई-बडोदा द्रुतगती मार्गाच्या मुख्य मार्गाची लांबी ३७८.७२२ कि.मी. असून त्यापैकी Spur मार्गाची लांबी ९४.२९० कि.मी. आहे. सदर रस्त्यामुळे पालघर जिल्हयाती तलासरी, डहाणु, पालघर, वसई, वाडा व ठाणे जिल्हयातील भिवंडी, कल्याण, अंबरनाथ ही गावे पनवेल मार्गास जोडण्यात येणार आहेत.
(३) मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गासाठी भुसंपादनाची कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ आणि Right to fair Compensation & Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act-२०१३चे Schedule -१, २ & ३ नुसार प्रगतीपथावर आहे. वरील कायद्यानुसार सक्षम प्राधिकारी (भूसंपदान) यांनी निश्चित केल्यानुसार मोबदला (जमिनीसह घरे, विहिरी, झाडे, कुंपण, बोअरींग इत्यादींचा) संबंधित भूधारकांना सक्षम प्राधिकारी यांचे मार्फत अदा करण्यात येणार आहे.
(४) होय.
(५) व (६) भुसंपादन अधिकाऱ्यांमार्फत गावकरी व संघर्षसमिती सोबत त्यांच्या हरकतीचे निरसन करण्यासाठी बैठका घेण्यात येत असल्याचे प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

गडचिरोली जिल्हयातील अहेरी तालुक्यातील वेलगूर टोला या आदिवासी गावातील वनहक्क दाव्याचे प्रस्ताव तहसील कार्यालयातून गहाळ झाल्याबाबत

(३३) ३५५८६ (०८-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील अहेरी तालुक्यातील वेलगूर टोला या आदिवासी बहूल गावातील नागरिकांनी सन २०१३-१४ मध्ये वनहक्क दाव्यासाठी तलाठयामार्फत अहेरी तहसील कार्यालयात प्रस्ताव सादर केले असता दोन वर्षापासून सदर प्रस्तावावर काहीच कार्यवाही झालेली नसल्यामूळे नागरिकांनी तहसील कार्यालय जावून प्रस्तावाबाबत माहिती घेतली असता सदर प्रस्तावच तहसील कार्यालयातून गहाळ झाले असल्याची धक्कादायक माहिती दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून त्या अनुषंगाने दोषीवर असणाऱ्या संबंधितांवर कोणती करवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (३१-०३-२०१६) :(१) व (२) नाही.

तथापि, वेलगूर टोला या गावातील नागरीकांचे वनहक्क दाव्यांचे एकुण १८ प्रस्ताव तलाठ्यामार्फत दिनांक १०/०९/२०१५ रोजी तहसिल कार्यालय, अहेरी येथे प्राप्त झाले. प्रकरणी उपविभागीय वनहक्क समितीच्या निर्देशानुसार सदर प्रस्तावाची पडताळणी व सत्यता तपासणी करण्याची कार्यवाही तहसिल कार्यालय, अहेरी यांचेकडे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सार्वजनिक बांधकाम खात्याचे अलिबाग येथील शासकिय तुषार विश्रामगृहाचे दोन वर्षापासून देखभाल दुरुस्तीच्या कामाला विलंब झाल्याबाबत

(३४) ३६६२९ (२२-१२-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम खात्याचे अलिबाग (ता.अलिबाग, जि रायगड) येथील शासकिय तुषार विश्रामगृहाचे गेल्या दोन वर्षापासून देखभाल दुरुस्तीच्या कामाला विलंबामुळे कक्षाअभावी अभ्यागतांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतीनिधिनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विश्रामगृहाच्या कामासाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे व किती निधी उपलब्ध झाला आहे व किती खर्च झाला आहे,

(३) असल्यास, सदर विश्रामगृहाच्या दुरुस्ती कामासाठी आवश्यक निधीची उपलब्धता नसल्यामुळे कामास विलंब होत आहे, हि ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विश्रामगृहाचे काम पूर्ण होण्यासाठी शासनाने चौकशी करून आवश्यक निधी उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) विश्रामगृहाच्या कामासाठी एकूण रु. ४६.७४ लक्ष रकमेच्या किंमतीस मंजूर प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी रु. ४१.०० लक्ष इतका निधी खर्च झाला असून उर्वरित रु. ५.७४ लक्ष निधीची आवश्यकत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

काळूस्ते (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील शासकीय आश्रमशाळेच्या हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

(३५) ३६७०५ (२२-१२-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळूस्ते (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील शासकीय आश्रमशाळेच्या हलगर्जीपणामुळे कु.रामदार झुगरे (वय १४) या विद्यार्थ्यांला वेळेत उपचार न मिळाल्याने केवळ ताप येवून जिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आश्रमशाळेत संबंधित अधीक्षक, शिक्षक मुख्यालयात राहत नसल्याने विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होत आहे परिणामी उपचार वेळेत मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन काही प्रसंगी मृत्यूही ओढवतो हे लक्षात घेता शासन त्वरीत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२१-०४-२०१६) :(१) कु.रामदास झुगर, इ.८ वी च्या विद्यार्थ्यांस दि.२८/९/२०१५ रोजी, दुपारी ताप आल्याचे लक्षात येताच त्यास त्याच दिवशी प्राथमिक आरोग्य केंद्र काळुस्ते येथे दाखल करुन वैद्यकीय उपचार करुन डॉक्टरांनी ग्रामीण रुग्णालय, घोटी येथे उपचारासाठी दाखल केले. तेथील डॉक्टरांनी उपचार करुन पुढील उपचारांसाठी ग्रामीण रुग्णालय, नाशिक येथे पाठविले. तथापि, त्यानंतर दि.२९/९/२०१५ रोजी जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे औषधोपचार सुरु असतांना सकाळी १०.०० वाजता त्याचा मृत्यु झाला.

(२) सदर प्रकरणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांचे कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली असून प्राथमिक चौकशीत उक्त आश्रमशाळेचे अधीक्षक हे अन्नपुर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृह मुंढेगाव, ता.इगतपुरी येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असून मुख्याध्यापक व इतर शिक्षक हे मुख्यालयी राहत असल्याचे आढळून आले.

तसेच प्रकरणी सदर शाळेचे मुख्याध्यापक, अधिक्षक व वर्गशिक्षक यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या होत्या. तथापि त्यांचा खुलासा स्विकारर्ह असल्याचे आढळून आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगांव पेठ (जि.अमरावती) येथील रतन इंडिया औष्णीक विज प्रकल्प या कंपनीद्वारे रस्त्याची झालेली दुरावस्था

(३६) ३७१३४ (२२-१२-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रतन इंडिया औष्णीक विज प्रकल्प (औद्योगिक) वसाहत नांदगांव पेठ, (जि.अमरावती) येथे वलगांव येथून कोळशाची ओव्हरलोड वाहतुक होत असल्याने रस्ता खराब झाल्याची बाब स्थानिक प्रशासनाचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिनांक १० जुलै, २०१५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे अधिकाऱ्यांची बैठक घेवून सदर रस्ता तातडीने संबंधित कंपनीद्वारे दुरुस्त करण्याचे आदेश निर्गमित केले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या कंपनीद्वारे सदर रस्ता दुरुस्त करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०४-२०१६) :(१) व (२) हे खरे आहे.
(३) रतन इंडिया कंपनीने अमरावती कडे येणाऱ्या वळण रस्त्यावर साधारणत: ५०० मीटर लांबीमध्ये खडीकरण केले आहे. परंतु त्यावरील डांबरीकरण वारंवार सुचना देऊनही केले नसल्यामुळे कंपनीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा केलेली (रु.५.०० लक्ष) अनामत रक्कम जप्त करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गुंज ते खडका (ता.महागाव, जि.यवतमाळ) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(३७) ३७९४३ (२२-१२-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुंज ते खडका या रस्त्यावर मागील दहा वर्षात दरवर्षी काही कोटी खर्च करण्यात आला आहे, चालु आर्थिक वर्षात गुंज ते खडका या रस्त्याचे नुतणीकरणाचे काम नुकतेच करण्यात आले आहे. सदर रस्त्याची लेवल न करताच यावर्षी अतिवृष्टी नसतांनाही सदरचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने पुर्णपणे उखडून जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुंज ते पुसद व गुंज ते महागाव फुलसावंगी या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले असल्याने दुचाकी व इतर वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून अपघाताचे प्रमाण वाढले असल्याने शासन सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याचे आदेश संबंधित विभागास तात्काळ देणार आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) खड्डे भरण्याचे काम करण्यात आले असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू तालुक्यातील सिमा तपासणी नाका-दापचारी रा.मा.क्र. ८ वर वाहनाकरिता पर्यायी मोकळा मार्ग नसल्याबाबत

(३८) ३८०२० (२२-१२-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) अंतर्गत सिमा तपासणी नाका दापचरी येथे रा.मार्ग क्र. ८ वर सदभाव कंपनीस वाहने क्रॉसिंगचा ठेका मिळालेला असता या मार्गावर अत्यावश्यक वाहने (ॲम्बुलन्स, दुग्ध व सरकारी वाहने, स्कुल बसेस) याकरिता पर्यायी मोकळा मार्ग नसल्याचे दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यायी मार्ग नसल्याने सन २०१३ ते २०१५ मध्ये वाहतुक कोंडी झाल्यामुळे दोघांचे प्राण गेलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करण्यात आली आहे काय तसेच चौकशीच्या अनुषंगाने १ व २ बाबींमधील समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील मौजा कतलाबोडी येथील अनुसूचित जनजाती व इतर पारंपारिक वन निवासी वन हक्क हक्कासाठी पट्टा मिळणेबाबत

(३९) ३९१५५ (१३-०१-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील मौजा कतलाबोडी येथील सर्वे न. ४९ आणि ४४, वर श्री. नारायण रुधा वरकडे, शंकर रुधा वरकडे (गोंड आदिवासी) रा. पांजरा तह.मोहाडी, जि.भंडारा तसेच श्री. सुदाम सदाशिव शिवकर व इतर पाच लोकांनी अतिक्रमण करुन वनहक्क अधिनियम २००६ अन्वये नियमाकृत करण्याबाबत उपविभागीय अधिकारी मौदा जि. नागपूर यांना प्रस्ताव सादर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावानुसार वनहक्क अधिनियम २००६ अन्वये नियमाकृत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०१-०४-२०१६) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील मौजा कतलाबोडी येथील सर्वे नं. ४९ व ४४ जमिनीवर (१) श्री. सुदाम सदाशिव शिवनकर, रा.कांद्री, ता. मोहाडी, (२) श्री.नारायण रुधाजी वरखडे, रा.पांजरा, ता.मोहाडी, (३) श्री.उपासराव सीताराम वरखडे, रा.पांजरा, ता.मोहाडी, (४)

श्री.सदाशिव महादेव भलावी, रा.किरणापूर, ता.रामटेक या ४ दावेदारांना जिल्हास्तरीय वनहक्क समितीच्या दिनांक ०५/०९/२०१५ रोजीच्या बैठकीत वनहक्क अधिनियम २००६ अन्वये वैयक्तिक वनहक्क दावे मंजूर करण्यात आलेले असून दिनांक ०३/१२/२०१५ रोजी सदर लाभार्थ्यांना पट्टे वाटप करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सांगलीतील कऱ्हाड-चांदोली रस्त्यावर शेडगेवाडी (ता.शिराळा) येथे असणाऱ्या वारणा-डाव्या कालव्याच्या पुलाखाली पाणी साचत असल्याबाबत

(४०) ३९२१८ (२०-०१-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगलीतील कऱ्हाड-चांदोली रस्त्यावर शेडगेवाडी (ता.शिराळा) येथे असणाऱ्या वारणा-डाव्या कालव्याच्या पुलाखाली मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने त्या रस्त्यावरुन जाणारे पादचारी व वाहनचालक यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागल्याने त्यांच्यामध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर दरवर्षी अनेक छोटे-मोठे अपघात होत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही बाब तेथील ग्रामस्थांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर शासनाने त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१०-०६-२०१६) :(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

सदर जलसेतूच्या पारमार्गाच्या छेदन ठिकाणी कालव्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असते, त्यामुळे जलसेतूखाली पाणी साठते. जलसेतूच्या ठिकाणी कॉंक्रीटचा रस्ता आहे. या रस्त्यावर थांबलेले पाणी मोठ्या वाहनांच्या बरोबर वाहून येऊन वरील बाजूस असलेल्या डांबरी रस्त्यावर येत असलेले रस्त्यावर खड्डे पडतात व सदर खड्डे हे पाण्याने भरलेले असल्याने मोटर सायकल चालकांचे निदर्शनास येत नाहीत. त्यामुळे किरकोळ स्वरुपाचे अपघात या ठिकाणी झालेले आहेत. अपघाताबाबतची नोंद पोलिस ठाणे कोकरुड यांच्याकडे झालेली नसल्याने त्यांच्या अहवालावरुन दिसून येते.

(३) सदर ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी सा.बां. विभागाने घातलेला पाईपपैकी गाळाने भरलेल्या पाईप साफ करण्यात आले आहेत. तर खराब पाईप बदलण्यात आले आहेत. त्यामुळे पाण्याचा निचरा होत आहे. सद्यस्थितीत सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे. मात्र, जलसेतून होणारी पाण्याची गळती जलसंपदा विभागाकडून थांबविणेबाबत त्यांना कळविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बडनेरा कार्यालय नांदगांव खंडेश्वर येथे स्थलांतरीत करण्याबाबत

(४१) ४३२०० (२९-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.अमरावती) तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र मोठे असल्याने बडनेरा कार्यालय पूर्णत: एका टोकाला असल्याने कामकाज करणे कठीण होत असल्याने नांदगाव-खंडेश्वर हे तहसिल ठिकाण मध्यवर्ती असल्याने बडनेरा येथील कार्यालय नांदगांव-खंडेश्वर येथे स्थलांतरीत करण्याची मागणी स्थानिक नागरीकांकडून व लोकप्रतिनिधींकडून होत असून याबाबतचे निवेदन अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगांव-खंडेश्वर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१६) : (१) व (२) होय.

बडनेरा येथील सा.बां. उपविभागाचे कार्यालय मा. सदस्यांच्या मागणीनुसार नांदगांव खंडेश्वर येथे स्थलांतरीत करण्याच्या दृष्टीने नांदगाव खंडेश्वर येथे उपलब्ध शासकीय जागेवर कार्यालयाचे बांधकाम करणे आवश्यक आहे. प्रस्तुत इमारतींच्या बांधकामासाठी वित्त विभागाच्या मान्यतेने काम अर्थसंकल्पाद्वारे मंजूर करुन इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रस्तुत कार्यालय नांदगांव खंडेश्वर येथे स्थलांतरीत करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दहिदुले-तिळवण (ता.बागलाण,जि.नाशिक) या रस्त्याची झालेली दुरावस्था

(४२) ४३६८३ (२९-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिदुले-तिळवण (ता.बागलाण,जि.नाशिक) या रस्त्याची दुरुस्ती गत तीन वर्षात करण्यात आली नसल्याने रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असून जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी सातत्याने करुन देखील रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्ता हा सटाणा (रामा.७) ते दऱ्हाणे पिंपळदरे नवेगाव तिळवण सावर दहिदुले रस्ता इजिमा क्र. ९७ चा भाग आहे. रस्त्याची दुरुस्ती व देखभालीचे काम जिल्हा परिषद नाशिक यांच्या अखत्यारीत आहे.

(२) व (३) दहिदुले ते तिळवण या भागाची ७.०० किमी लांबी आहे. या लांबीत साक्र.०/०० ते ४/८०० मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत डांबरीकरण करण्यात आले आहे.

साक्र.४/८०० ते ५/५१५ मध्ये जिल्हा परिषद नाशिक मार्फत डांबरीकरणाचे काम सन २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

साक्र.५/५१५ ते ७/०० मधील कामाबाबतची निविदा प्रक्रीया प्रगतीत आहे.

रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घसु-पडोली-घुग्घुस-वणी या मार्गाच्या चौपदरीकरणाबाबत

(४३) ४६४२८ (२९-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घसु - पडोली- घुग्घुस- वणी या मार्गाचे चौपदरीकरणाचे काम संथगतीने होत असल्यामुळे उद्योजकांवर नुकसान भरपाई रु. ५१,९०० प्रतिदिन प्रमाणे प्रस्तावित करण्यात आली असल्याचे कपासू-२०१४/१७७/प्र.क्र.५९/रस्ते-९ दि. ५ मार्च अन्वये मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी स्थानिक लोकप्रतिनिधी, चंद्रपूर यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योजकाकडून किती नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ३१/०३/२०१६ पर्यत उद्योजकावर रु. ७,६०,३३५००/- नुकसान भरपाई आकारण्यात आलेली असून दिनांक ३१/०३/२०१६ त्यापैकी रु. २,००,८५३००/-ची वसुली करण्यात आलेली आहे.

(३) दिनांक ३०/०४/२०१६ पर्यत अंदाजे ९५% रस्त्याचे बांधकाम पुर्ण झालेले असून उद्योजकाने दिनांक १५/०५/२०१६ पर्यत काम पुर्ण करण्याचा कार्यक्रम दिलेला आहे. तरी पण प्रत्यक्षात दि. ३०/०६/२०१६ पर्यत काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

यवतमाळ ते घाटंजी मार्गे आकपुरी या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

(४४) ४६५८० (२९-०४-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ ते घाटंजी मार्गे आकपुरी रस्ता ३६ कि.मी अंतर असलेल्या राज्य महामार्गावर ब-याच ठिकाणी रस्त्याच्या मधोमध मोठे खड्डे पडल्याने भीषण अपघात होण्याची भीती नागरीकांमधून व्यक्त करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करून देखील रस्ता दुरुस्ती करण्यात येत नसल्याने नागरीकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रहदारीचा रस्ता दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणते नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१६) :(१) नाही.

(२) सदर रस्त्यावर पडलेले खड्डे नोव्हेंबर, २०१५ अखेर भरण्यात आले आहेत तसेच रस्त्यावर पडलेले खड्डे वेळोवेळी भरुन रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(३) सदर रस्त्याचे कौळंबी फाटा ते घाटंजी व वडगांव ते खापरी फाटा या लांबीतील रस्त्याची सुधारणा करण्याचे काम केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मंजूर असून निधी उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राधानगरी (जि.कोल्हापूर) येथील कौलव-बरगेवाडी यांना जोडणाऱ्या रस्त्यावरील पूलाचे व रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(४५) ४६७१७ (२९-०४-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) येथील कौलव-बरगेवाडी यांना जोडणाऱ्या रस्त्यावरील पूलाचे व रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावरील पूलाचे बांधकाम निकृष्ट झाल्याने पावसाळयात वाहतुकीस नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी वारंवार करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ता त्वरित दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) :(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील राजेगांव ते येवला, रांजणी रस्त्याचे कच्चे काम व डांबरीकरण अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

(४६) ४७३२३ (२९-०४-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील राजेगांव ते येवला, रांजणी रस्त्याचे कच्चे काम व डांबरीकरण अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याने ते बंद करुन चौकशी करण्यात यावी, अन्यथा घनसावंगीतील जुन्या बसस्टँडजवळ आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी शासन स्तरावर करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आहे,

(३) तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन रस्त्यांची कामे अंदाजपत्रकीय तरतूदीप्रमाणे व निविदा शर्तीनुसार करण्यात येत आहेत. सदर कामे प्रगतीपथावर असून कामांचा दर्जा समाधानकारक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

करंजी-घुग्गुस (ता.वणी, जि.यवतमाळ) या राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाबाबत

(४७) ४८१३६ (२९-०४-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजी-घुग्गुस (ता.वणी, जि.यवतमाळ) या राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या पाच-सहा वर्षापासून सुरु आहे, मात्र आतापर्यंत झालेली कामे दर्जेदार नसून या मार्गावर अनेक तडे गेल्याचे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची डागडुजी करण्याचे काम रस्ता तयार करणाऱ्या कंपनीकडून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याचे निकृष्ट कामाची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधीत कंपनी व कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

(४) चौकशी अधिकाऱ्यांनी कॉक्रीट पेवमेंटचे कामाचा दर्जा समाधानकारक नसल्याचे चौकशी अहवालात म्हटलेले आहे. सदरहु कामावर गुणनियंत्रण राखणे करिता स्वतंत्र अभियंत्याची शासना तर्फे नेमणुक करण्यात आली आहे. तसेच करारनाम्यातील कलम ५.१.१ व १३.३ नुसार गुणवत्ते संदर्भात मुख्य जबाबदारी उद्योजकाची असुन उद्योजकानी उत्तम गुणवत्ता व व्यावसायीक रुची राखून प्रकल्प पुर्ण करणे अभिप्रेत आहे. असे चौकशी अहवालात नमुद केले आहे. तडे गेलेल्या कामाची दुरुस्ती उद्योजकांकडून करुन घेण्यात येत आहे.

शिरुर ताजबंद ते नरसी दुपदरीकरण व नरसी बिलोली ते राज्य सिमा दुपदरीकरण आणि बाजूने फरसबंदी करणेबाबत

(४८) ४९७७७ (२९-०४-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये राज्यमार्ग २२५ चे डीबीएफओटी तत्वानुसार शिरुर ताजबंद ते नरसी दुपदरीकरण व नरसी बिलोली ते राज्यसिमा दुपदरी करण्यासह फरसबंदी करणे १०५.२० कि.मी.चे कंत्राट केटीआय कंन्स्ट्रक्शन लि. या कंपनीला देण्यात आले, शासनासोबत झालेल्या करारा अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाने करार अस्तित्वात आल्याच्या ९० दिवसांचे आत प्रकल्पाचे संकल्पचित्र देण्यात सुरक्षा सल्लागार नेमुन रस्ता सुरक्षित व मोटार वाहतुकीस योग्य होण्यासाठी सुरक्षात्मक उपाययोजना शिफारसी करावयाच्या होत्या परंतु एप्रिल, २०१४ रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला तो पर्यंत सुरक्षा सल्लागार नेमला गेला नाही असे कॅगच्या २०१५ चा अहवाल (आर्थिक क्षेत्र) क्र.३ नुसार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रकल्पासाठी स्वातंत्र अभियंत्याची नेमणूक १६ जून २०११ ला करणे अपेक्षित असताना २२ जुलै, २०१३ ला करण्यात आला असून या स्वातंत्र अभियंत्याने बांधकामाच्या गुणवत्तेशी संबंधीत तांत्रिक प्रमाणांच्या संदर्भातील तफावती आणि कमतरता दर्शवून १०२ नॉन कॉन्फॉरमिटी रिपोर्ट जारी करुन निकषाप्रमाणे काम होत नाही असे जाहीर केले हे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्र. १ नुसार सुरक्षा सल्लागार नेमताच हा प्रकल्प पूर्ण करण्यात येवून हा रस्ता वाहतुकीसाठी खुला केला गेल्यापासून ताजबंद शिरुर ते नरसी राज्यसिमा यारस्त्यावर शेकडो छोटे मोठे अपघात होऊन अपरिमित मनुष्य हाणी झाली त्याची नुकसान भरपाई जबाबदार संबंधीतांकडून करण्यासंबंधीची कोणती कार्यवाही करण्यात येत आहे, (उक्त प्रश्न क्र. २ नुसार) स्वतंत्र अभियंत्याने १०२ नॉन कॉन्फॉरमिटी रिपोर्ट जारी करुन गुणवत्तेच्या निकषा प्रमाणे कामे होत नसल्याप्रकरणी दखल घेऊन कोणती कार्यवाही करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) अपघाता विषयीची माहिती या कार्यालयाच्या अभियंत्याने दिलेल्या १०२ नॉन कॉन्फॉरमिटी रिपोर्ट नुसार रस्ता सुधारणेचे कामे उद्योजकाकडून करुन घेतली असून त्याचा पुर्तता अहवाल स्वंतत्र अभियंत्याने मान्य केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासीबहुल क्षेत्रात वर्ग ३ आणि ४ ची पदे १०० टक्के आदिवासींसाठी आरक्षित करणारा कायदा रद्द करण्याची होत असलेली मागणी

(४९) ५१५६० (२९-०४-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासीबहुल क्षेत्रात वर्ग ३ आणि ४ ची पदे १०० टक्के आदिवासींसाठी आरक्षित करणारा दि. ५ मार्च २०१५ पासून लागू करण्यात आलेला कायदा तत्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी बिगर आदिवासी हक्क बचाव समितीने निवेदनाद्वारे शासनाकडे केल्याचे फेब्रुवारी २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित क्षेत्रात राहणाऱ्या बिगर आदिवासी समाजाची लोकसंख्या ही अनेक ठिकाणी आदिवासी समाजापेक्षा अधिक असून या समाजातील अनेक कुटुंबे भूमीहीन तसेच अत्यल्प उत्पन्न गटातील किंबहुना दारिद्रयरेषेखालील जीवन जगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार हा कायदा रद्द करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. विष्णु सवरा (१३-०६-२०१६) :(१) यानुषंगाने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि बिगर आदिवासी हक्क बचाव समिती शहापूर यांच्याकडून दि. २४/०६/२०१५ रोजी याबाबतचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. तथापि सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक दि. २६/०६/२०१५ मधील १३ (२) नुसार जिल्हयातील एकूण रिक्त पद संख्या विचारात घेऊन त्यापैकी प्रत्येक वर्षी रिक्त होणाऱ्या पदांपैकी जास्तीत जास्त २०% पदे अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक आदिवासीमधून भरावयाची आहेत व उर्वरीत ८०% पदांना शासन निर्णय दि. ०५/०३/२०१५ मधील परिच्छेद ९ नुसार आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ४ (२) नुसार नियमित आरक्षण लावून उर्वरीत पदे अनुसूचित क्षेत्राबाहेर भरावयाची आहे. ही प्रक्रिया अनुसुचित क्षेत्रातील सर्व पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्यापर्यंत सुरु राहील. तद्नंतर अनुसूचित क्षेत्राबाहेर असलेल्या मंजूर पदांना नियमित आरक्षण लागू राहील सबब, सदर प्रक्रिया टप्प्याटप्प्याने होणारी असल्याने व यासाठी काही वर्षाचा कालावधी लागणार आहे तसेच अनुसूचित जमातीच्या सर्वांगीण विकासाकरिता मा. राज्यपाल महोदयांनी भारतीय राज्यघटनेच्या ५ च्या सुचितील परिच्छेद५ (१) नुसार प्रदान केलेल्या अधिकांरान्वये सदर अधिसूचना काढण्यात आलेल्या आहेत. सबब, सदर अधिसूचना व यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेला दि. ०५/०३/२०१५ व दि. २६/०६/२०१५ चे शासन निर्णय रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मौजे चिखली (जहांगीर) ते उमरखेड (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग उमरखेड अंतर्गत कन्स्ट्रंक्शन कंपनीचे नावाने हॉटमिक्सचे काम न करताच दीड कोटी रुपयांचे बिल काढण्यात आल्याबाबत

(५०) ५१८६१ (२९-०४-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखली (जहांगीर) ते उमरखेड (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग उमरखेड अंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात कि.मी. २४९ ते २५४ हे काम परतवाडा जि.अमरावती येथील कन्स्ट्रंक्शन कंपनीचे नावाने हॉटमिक्सचे काम न करताच दीड कोटी रुपयांचे बिल काढण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासन उच्चस्तरीय चौकशी करुन कारवाई करणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.